# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक :२/एनजीसी/मान्यता/फार्मसी/२००६/६२२
दिनांक : 17 जुलाई JUL 2006

प्रति,
प्राचार्य,
अर्ध दुर्गा एज्युकेशन सोसायटी,
दादासाहेब दाक्षपांडे कॉलेज ऑफ फार्मसी,
स्वामी समर्थ धाम, पो. पिपला, हुडकेश्वर,
बेसा, नागपूर- ४१२ ४११.

विषय- शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून विना अनुदान तत्वावर नवीन बी फार्म अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भः- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः पिईसी-२००६/ (२८९/०६) तांशि-१, दिनांक १४ जून २००६.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्यां अधिन राहून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सन २००६-२००७ पासून कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१अ; दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणाऱ्या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.
४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु.८.०० लाख भारतीय स्टेट बँक, रामदासपेठ, नागपूर शाखा येथे पावती क्रं. १५२०१३, दि.२८/६/२००६ अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी रु.७.०० लाख संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

५. आपल्या संस्थेला तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई तसेच महाराष्ट्र शासन आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम,आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संदर्भाच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. आपल्या संस्थेची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती यांचा यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यांत यावा. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे.निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चीत केल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणाऱ्या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इ. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांना त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणाऱ्या उणीवांवर उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा, कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११.सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शै.व.२००६-०७ साठी प्रवेशनियमात विहित केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१२.विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१३. सदर अभ्यासक्रमासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील व सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता मिळाली नाही तर सदर अभ्यासक्रम तात्काळ बंद करावा लागेल अन्यथा होणाऱ्या सर्व परिणामास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

१४. शासनाने, या संचालनालयाने व कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
३. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. कार्यासन क्रमांक २ अ मुख्य कार्यालय,मुंबई.
५. श्री.एन. बी.पाटील,सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

C:\My Documents\JADHAV M.R\Orders 06-07\Degree Pharmacy 06-07.doc

PRINCIPAL